अनुक्रम २६९८७
विभाग बो. वा.
क्रमांक २८०५)
नौं. दि. २३।९।६०

म. ग्रं. सं. ठाणे, वाङ्मयालय शाखा.
दा. क्र. २५९९ नों. दि.
वि. ७१.५१

IRBK-0102698

नवीन प्रकाशनें

- अंजनी ( बाळ गाणीं ) १।०
- क्रांतिमहिला ( चरित्र ) ०।८

२६९८

ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आ. च.
क्र. २६९८

# क्रांतिपुरुष

"परकी शस्त्रास्त्रांच्या सहाय्याने दास्यात जखडून टाकलेलें राष्ट्र हे निरंतरच युध्यमान राष्ट्र होय नि शस्त्रांनी उघडउघड रणांगणात उतरून सामना देणें अशक्य असल्यामुळे मी दबा धरून हल्ला चढविला. बंदुका तोफा वापरायची मला परवानगी नाही म्हणून मी पिस्तुल वापरलें

हिंदु म्हणून माझी भावना अशी आहे की, माझ्या देशाचा अपमान हा प्रत्यक्ष परमेश्वराचा अपमान होय ज्याची प्रकृति यथातथाच आहे आणि बुद्धि सामान्य आहे, अशा मजसारख्या भारतीयाजवळ मायदेशासाठी देता येईल असें काही असलेच तर तें स्वतःचे रक्तच होय. तें रक्त मी स्वातंत्र्याच्या स्थंडिलावर अर्पिलें आहे ' दास्याचा संबंध संपर्यंत इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यातील संग्राम अखंडपणे चालूच राहील ' "
राष्ट्रीय युद्धात आम्ही धारातीर्थी प्राण देऊ आमच्या धर्मावर अत्याचार करणाऱ्या शत्रूच्या रक्ताने आम्ही ही भूमि भिजवून टाकू. आम्ही ठार मारल्यावरच मरू नाही मात्र बायकाप्रमाणें आमच्या पराक्रमाच्या गोष्टी मागाहून ऐकाल

गुलामगिरीत रहावयाला तुम्हाला शरम वाटत नाही काय ! तसें असेल तर निदान आत्महत्या करण्याचा प्रयत्न करा. हे दुष्ट लोक कसाबाप्रमाणें गाई व वासरें यांची हत्या करीत आहेत तरी गोमातेला या जाचातून सोडवा मरा त्या दिवशी किर्लोस्कर मंडळीच्या शारदा नाटकाचा प्रयोग होता आणि जॅक्सन साहेब ...... करण्यात आले होते जॅक्सन आपल्या खुर्चीवर कान्हेरेनें आपलें पिस्तुल उपसलें आणि त्याच्यावर केला पहिल्या गोळीलाच जॅक्सनचा बळी पडला समजून व त्याचे पोवाडे म्हणून स्वातंत्र्य मिळत ...णें जिवावर उदार होऊन निघडपणाची ...न ...नी हे ... यापुढे ... टाळनलवार चाळणी पाहिजे आम्ही शत्रूंचें हजारो ... " हे परमेश्वर ... आमची हृदये त जाणतात ' ... ... भारत ... चारित्र का ... हीच ... ला दावरची ... म्हणून त ... ... यांवर चढल ... राजता ... दिली







हुतात्म्यांनो, तुम्हाला ... तून जाण्याला तुम्ही सिद्ध ... म्हणून तुम्ही देशमातेला ... स्वाभिमानरक्षणार्थ तुम्ही ... जीव बचावला असता हे ... झालें असतें मनाची उभ... एक पाश मात्र अधिक घ... दाखवून म्हटलें असतें, " ... गुलामगिरीत तो सुख मा...

.क्रांतियुद्ध सुरू झाले ... पावतें तुम्ही चालू केलेला ... तुम्ही लढाया खेळत ... होत्या असें आम्ही मानतो ... अखेरचा पराभव नव्हे ... विजयाचा देदीप्यमान मुकु... तोपर्यंत लढा थांबणार ... दुसऱ्याच एका चौकाची... मेळ पडाला व बेनी टंट... ... चणफुटाणे घत ... व ... त्यांना ... सापड... म्हणाले ... ...

IRBK-0102698
IRBK-0102698

२९९८

# क्रांतिपुरुष

[ चौदा क्रांतिपुरुषांचीं चरित्रें ]

17 JUN 1976

संपादक

पांडुरंग श्रीधर टिळू

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. २६९९ नों. दि
वि.

IRBK-0102698

IRBK-0102698

ललिता प्रकाशन

* ६ *

मूल्य चार आणे

## अभिवादन ! • • •

स्वतंत्र भारताच्या आधुनिक इतिहासामध्यें सशस्त्र क्रांति करूं पाहाणाऱ्या तेजस्वी क्रांति-पुरुषांचें एक नवें स्वतंत्र आणि वैभवशाली पर्व आहे. त्यांच्या कार्याचें व त्यांच्या धगधगणाऱ्या आत्म्यांचें तेज स्वतंत्र भारताच्या खऱ्या क्रांतिकथांमध्येंच फुलून अन् खुलून दिसणार आहे. वीरांच्या त्या अलोट त्यागाच्या नि निःस्सीम देशभक्तीच्या ज्वलंत कथा वाचतांना नसानसांतून रक्त सळसळतें अन् आपोआप मुठी वळल्या जातात ! भारताच्या दूरवर असलेल्या स्वातंत्र्यासाठीं आपल्या पवित्र नि प्रिय प्राणांचें बलिदान करणारे, अन् खंबीर वृत्तीनें वधस्तंभाला कवटाळणारे हे क्रांति-पुरुष सर्व काळ वंदनीयच ठरतील ! प्रणाम !!

— पां. श्री. टिळू

आ वृ त्ति प हि ली
दी पा व लि १ ८ ६ ९
१९६९

प्रकाशक **पां. श्री. टिळू**
झावबाची वाडी, मुंबई २

मुद्रक **र. रा. ब ख ले**
मुंबई वैभव प्रेस, मुंबई ४

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मु ख पृ ष्ठ क ल्प ना
**पां. श्री. टिळू**, मुंबई २

मु ख पृ ष्ठ छ पा ई
यशवंत प्रिं. प्रेस मुंबई ४

मु द्रा घ ड ा ई
बॉ म्बे प्रो से स स्टू डि यो
मे डो ज स्ट्री ट, मुं ब ई १

★

### क्रांतिज्योति—

- अभिवादन, प्रणाम, या क्रांतिपुरुषांनो, मदनलाल धिंग्रा, शिवराम हरि राजगुरु,
- चंद्रशेखर आझाद, विष्णु गणेश पिंगळे, सरदार भगतसिंग, खुदिराम बोस,
- अनंत लक्ष्मण कान्हेरे, दामोदर हरि चाफेकर, बारींद्रकुमार घोष, राशबिहारी बोस,
- गोपीमोहन साहा, पं. रामप्रसाद बिस्मिल, सुखदेव, जतींद्रनाथ दास.

● ● ● प्रणाम ! !

हुतात्म्यांनो, तुम्हांला सर्व प्रकारें धन्यवाद आहेत. क्रांतीच्या जळत्या दिव्यांतून जाण्याला तुम्ही सिद्ध झालांत, ते आपल्या देशाचा स्वाभिमान टिकावा म्हणून. तुम्ही देशमातेला जागृत केलेंत, तिला उत्स्फूर्त केलेंत आणि तिच्या स्वाभिमानरक्षणार्थ तुम्ही समरांगण गांठलेंत. तुम्ही असें केलें नसतें तर तुमचा जीव बचावला असता हें खरें; पण त्यामुळें दास्याचें लांछन मात्र जास्त वज्रलेप झालें असतें. मनाची उभारी नाहींशी करणाऱ्या सहनशीलपणामुळें शृंखलेचा एक पाश मात्र अधिक घट्ट झाला असता आणि जगानें आपल्या देशाकडे बोट दाखवून म्हटलें असतें, " दास्यांत राहाण्याच्या लायकीचाच हा देश आहे. गुलामगिरींत तो सुख मानीत आहे ! "

...क्रांतियुद्ध सुरू झालें कीं स्वातंत्र्य अगर मृत्यु यांच्याद्वाराच तें विराम पावतें. तुम्ही चालू केलेला संग्राम पुढें चालू ठेवण्याचा आम्ही निश्चय करतों. तुम्हीं लढाया खेळलांत त्या स्वातंत्र्य- संग्रामांतील पहिल्या मोहिमेंतल्या लढाया होत्या असें आम्ही मानतों. त्या लढायांतील पराभव म्हणजे या संग्रामांतील अखेरचा पराभव नव्हे. नाहीं ! एक तर सौंदर्यसंपन्न भारताच्या डोक्यावर विजयाचा देदीप्यमान मुकुट तरी दिसेल अगर हौतात्म्याचें तेजोवलय तरी दिसेल; तोंपर्यंत हा लढा थांबणार नाहीं !!

—स्वातंत्र्यवीर सावरकर

★

# घ्या घ्या मातेस्तव जन्म क्रान्तीपुरुषांनो !

(जाति - भूपतिवैभव)

भारत-मातेच्या कीर्तिशाली पुत्रांनो ।
घ्या घ्या मातेस्तव जन्म क्रान्तिपुरुषांनो ॥
स्वर्गाहुनि प्रिय जी जन्मभूमि सकलांना ।
परवशतेमाजी ती साही छळ नाना ॥
असहाय अवस्था अशी तिची बघवेना ।
यासाठीं आतां सिद्ध आत्म-बलिदाना ॥
परदास्यामधुनी तिजला मुक्त कराया ।
ज्वलनांत होमिल्या तुम्ही आपुल्या काया ॥
प्रच्छन्नपणें वा प्रकट तुम्ही जें केलें ।
ते क्रान्तिकार्य दुर्दैवें न फळा आलें ॥
जरि तेव्हां होता काळ तुम्हां प्रतिकूल ।
परि आतां आला तोच काळ अनुकूल ! ॥
अतृप्त वासना राहियल्या तत्काळीं ।
घ्या जन्म घेउनी करा तृप्त या वेळीं ॥
कुणी षंढ तुम्हाला वृथा दूषणें देवो ।
'पथ चुकलेले देशभक्त' म्हणुनी हिणवो ॥
परि तुम्ही तयाची न करा कवडी पर्वा ।
या ! पवित्र गीता-धर्म शिकविण्या सर्वां ॥
जीं फांशीं जातां तुम्ही गाइली गीता ।
ती या षंढांना पुन्हा ऐकवा आतां !! ॥

**क्रान्ति चिरायु होवो !!**

मुम्बापुरी,
विजयादशमी, शक १८५९ } — सुरेश शर्मा

# क्रां ति पु रु ष

## १ • • मदनलाल धिंग्रा

ता० १ जुलै १९०९ रोजीं यांनीं लंडन येथें इंपीरियल इन्स्टिटयूटमध्यें भारत-मंत्र्याचे सल्लागार सर कर्झन वायली यांच्यावर चार गोळ्या झाडून त्यांना यमसदनीं पाठविलें. हे मूळचे पंजाबांतील क्षत्रिय. यांचे वडील पोलिस खात्यांत डी. एस्. पी. च्या हुद्यावर होते. मदनलाल १९०६ सालीं आगबोटीवर काम करून स्वकष्टानें इंग्लंडला गेले व इंजिनिअर होण्याच्या उद्देशानें त्यांनीं लंडनच्या विद्यापीठांत नांव दाखल केलें. त्यावेळीं त्यांचें वय अवघें २१ होतें व त्यांचें लग्न होऊन त्यांना एक मुलगाही झाला होता. १९०८ सालापासून सावरकर, शामजी कृष्णवर्मा प्रभृतींच्या सहवासांत आल्यावर त्यांच्यांतलें क्षात्र-तेज जागृत झालें व आपण कांहीं तरी करावें या हेतूनें १९०९ च्या जानेवारींत एक रिव्हाल्व्हर विकत घेऊन त्यांनीं नेमबाजीच्या शिक्षणाला प्रारंभ केला. थोड्याच दिवसांत ते बाँब तयार करण्यांतही तरबेज झाले आणि नॅशनल इंडियन असोसिएशनच्या वार्षिक समारंभाची वेळ साधून त्यांनीं कर्झन वायलीवर अचूक गोळ्या झाडल्या अन् त्यांचा बळी घेतला. या कृत्याबद्दल त्यांच्यावर खटला होऊन १७-८-१९०९ रोजीं सकाळीं ९ वाजतां पेन्टेन्व्हिली तुरुंगांत मदनलाल धिंग्रा यांना फांशी देण्यांत आलें.

" परकी शस्त्रास्त्रांच्या सहाय्यानें दास्यांत जखडून टाकलेलें राष्ट्र हें निरंतरच युध्यमान राष्ट्र होय. निःशस्त्र्यांना उघडउघड रणांगणांत उतरून सामना देणें अशक्य असल्यामुळें मी दबा धरून हल्ला चढविला. बंदुका तोफा वापरायची मला परवानगी नाहीं म्हणून मी पिस्तुल वापरलें.

हिंदु म्हणून माझी भावना अशी आहे कीं, माझ्या देशाचा अपमान हा प्रत्यक्ष परमेश्वराचा अपमान होय. ज्याची प्रकृति यथातथाच आहे आणि बुद्धि सामान्य आहे, अशा मजसारख्या भारतीयाजवळ मायदेशासाठीं देतां येईल असें कांहीं असलेंच तर तें स्वतःचें रक्तच होय. तें रक्त मी स्वातंत्र्याच्या स्थंडिलावर अर्पिलें आहे ! दास्याचा संबंध संपेपर्यंत इंग्लंड आणि हिंदुस्थान यांच्यांतील संग्राम अखंडपणें चालूच राहील ! "

—मदनलाल धिंग्रा

## २ ● ● शिवराम हरि राजगुरु

यांचा जन्म पुणें जिल्ह्यांत खेड येथें १९०८ सालीं झाला. संस्कृत शिकण्या- साठीं ते काशीला गेले व तर्कशास्त्राची मध्यमा परीक्षा पास झाले. त्यांना मर्दानी खेळांची खूप आवड होती. अमरावतीच्या हनुमान व्यायामशाळेंत त्यांनीं लाठीचें शिक्षण घेतलें होतें. डॉ. हर्डीकरांच्या सेवदालांतही ते कांहीं दिवस जात असत. काशीला असतांना त्यांचा 'हिंदुस्थान रिपब्लिकन पार्टी'शीं संबंध आला व चंद्रशेखर आझाद, महावीरसिंग, भगतसिंग, सुखदेव, जयगोपाळ वगैरेंच्या समवेत ते एम्. या नांवानें क्रांतिकार्य करूं लागले. ता. १७-१२-२८ रोजीं लाहोर येथें दुपारीं ४ वाजतां असिस्टंट पोलिस सुपरिंटेंडेंट मि. सॉंडर्स हे मोटार सायकलीवरून बाहेर पडतांच राजगुरूंनीं त्यांना गोळी झाडून ठार केलें. नॅशनल बँकेवर दरवडा घालणें, जोगेशचंद्र चतर्जींची सुटका करणें वगैरे कामांत त्यांचा भाग होता. त्यांना ता. २३-३-१९३१ रोजीं लाहोर येथें फांशी देण्यांत आलें.

★

## ३ ● ● चंद्रशेखर आझाद

ककोरी कटापासून सॉंडर्स खुनापर्यंत अनेक प्रकरणांशीं संबंध असूनही जन्मठेप किंवा फांशी या दिव्यांतून वांचलेल्या ह्या शूर तरुणाचें चरित्र म्हणजे एक रोमहर्षक वीरकथा आहे. १९२० नंतरच्या क्रांतिकारक युगांत आझादांचें नांव मोठ्या प्रेमादरानें उच्चारलें जातें. त्यांचा जन्म १९०७ सालीं झाला व वयाच्या १४ व्या वर्षापासून त्यांनीं कांहींना कांहीं चळवळी करण्यास प्रारंभ केला. १९२१ सालीं बनारसच्या संस्कृत कॉलेजवर पिकेटिंग केल्याबद्दल त्यांना पंधरा फटक्यांची सजा देण्यांत आली. दर फटक्यागणिक ते 'महात्मा गांधी की जय!' 'वंदे मातरम्' असें ओरडत. पण अखेर बेशुद्ध होऊन पडले. काशी विद्यापीठांत संस्कृतचें शिक्षण घेत असतांनाच त्यांनीं क्रांतिकारकांची दीक्षा घेतली. आपल्या पक्षाची संघटना करण्यांत त्यांनीं विशेष परिश्रम केले.

९ ऑगस्ट १९२५ च्या काकोरी कटांत ते सामील होते; पण फरारी झाले. त्यांनीं पुढें अनेक कटांत भाग घेतला; पण ते कधींही पकडले गेले नाहींत. 'मी जिवंतपणीं पोलिसांच्या हातीं लागणार नाहीं' अशी त्यांची प्रतिज्ञा होती आणि ती त्यांनीं पुरी केली. लाहोर कटाचे दोन खटले, व्हाइसरॉयांची गाडी उलथण्याचा प्रयत्न, सॉंडर्स खुनाचा कट वगैरे अनेक कटांत आरोपी म्हणून त्यांचें नांव येई व भगतसिंग प्रभृति त्यांचे सहकारी फांशीं गेले तरी ते पोलिसांना कधींच सांपडले नाहींत. त्यांना पकडण्यासाठीं ५ हजार रुपयांचें बक्षिस लावलें होतें. अखेर एका विश्वासघातकी मित्राच्या कारवाईमुळें अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्यें ता. २७-२-१९३१ रोजीं ते पोलिसांच्या जाळ्यांत सांपडले; पण त्यांच्या हातीं लागले नाहींत. समोर पोलिस दिसतांच त्यांनीं गोळ्या झाडायला आरंभ केला. पोलिसांनींही गोळीबार केला आणि या चकमकींत लढतां लढतां अखेर ते मृत्यु पावले. आझाद हे आदर्श क्रांतिकारक होते यांत शंका नाहीं.

★

## ४ ● ● विष्णु गणेश पिंगळे

१९१५ सालीं पंजाबी शीखांनीं सुरू केलेल्या 'गदर' चळवळींतील हे प्रमुख महाराष्ट्रीय क्रांतिकारक होत. १८८८ सालीं पुणें जिल्ह्यांत तळेगांव ( ढमढेरे ) येथें यांचा जन्म झाला. लहानपणीं त्यांची प्रकृति चांगली नव्हती. समर्थ विद्यालयांत शिक्षण घेतल्यावर कांहीं काळ ते हातमाग चालवीत होते. पण मेकॅनिकल इंजिनिअर होण्याची त्यांची महत्वाकांक्षा असल्यामुळें १९११ सालीं हर प्रयत्नानें ते अमेरिकेला गेले व तेथें त्यांनीं बिनतारी तारायंत्राचा अभ्यास सुरू केला. बाबा गुरुमुखसिंग यांच्या नेतृत्वाखालीं अमेरिकेंत हिंदी लोकांची जी गदर चळवळ सुरू झाली, त्या चळवळींत ते सामील झाले. अमेरिकेंत असतां लाला हरदयाळ यांच्याशीं पिंगळ्यांचा परिचय झाला होता व लष्कर आपलेंसें केल्याशिवाय व सशस्त्र क्रांति केल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं अशी त्यांची खात्री झाली होती. सैन्यांत फितुरी करण्याच्या उद्देशानें ते गुप्तपणें हिंदुस्थानांत आले; पण १९१५ च्या मार्च महिन्यांत त्यांना मिरत येथें अटक

करण्यांत आली. ते त्या वेळीं बाराव्या हिंदी घोडदळाच्या छावणींत फिरत होते. त्यांच्या अटकेच्या वेळीं त्यांच्याजवळ कांहीं दारुगोळा व ज्वालाग्राही द्रव्यें सांपडलीं. हिंदुस्थानांत बंड करण्यासाठीं अमेरिकेंतून हजारों लोक आणविण्याची त्यांची तयारी होती. पुढें थोड्याच दिवसांत लाहोर कटाचा खटला सुरू झाला, त्यांत पिंगळे यांना फांशीची शिक्षा झाली. भाई परमानंदांना जन्मटेप 'काळें पाणी' मिळालें.

१५ नोव्हेंबर १९१५ रोजीं वधस्तंभाकडे जाण्यास म्हणून पिंगळे यांना प्रातःकाळीं उठविलें. तेव्हां एखाद्या सौख्यमय प्रवासास निघावें अशा उत्सुकतेनें, आनंदानें आणि मोठ्या निर्भय वृत्तीनें ते निघाले. त्यांचें तें विलक्षण धैर्य पाहून त्यांच्या भोंवतालचे अधिकारी आश्चर्यचकित झाले. पिंगळे यांना शेवटची इच्छा काय म्हणून विचारतां, "ह्या हातकड्या काढून दोन्ही हात जोडून मला ईश्वराची प्रार्थना करूं द्या" एवढेंच ते म्हणाले. त्यांची विनंति मान्य करण्यांत आली. प्रत्यक्ष मृत्यूस कवटाळतांना धीरगंभीर आवाजांत पिंगळे म्हणाले, "हे परमेश्वरा, आमचीं हृदयें तूं जाणतोस! ज्या पवित्र कार्यासाठीं आम्ही आमचे प्राण बलिदान करीत आहोंत तें पवित्र कार्य तूं पूर्ण कर, हीच माझी तुला शेवटची प्रार्थना आहे!"

असें म्हणून ते वधस्तंभाच्या चौथऱ्यावर चढले. बरोबर सहा वाजतां त्यांच्या बाजूला उभ्या असणाऱ्या मांगांनीं स्तंभाखालील फळी झोकून दिली आणि क्षणाचाही विलंब न लागतां विष्णु गणेश पिंगळे यांचे प्राण पंचत्वांत विलीन झाले!

## ५ ● ● सरदार भगतसिंग

लाहोर कटाचा खटला, असेंब्ली बॉंब खटला, सॉंडर्स खून वगैरे अनेक प्रकरणांमुळें सर्वतोमुखीं झालेले सरदार भगतसिंग यांचा जन्म लाहोर येथें १९०७ सालीं क्रांतिकारक कुळांत झाला. त्यांच्या एका चुलत्याला (अजितसिंग) कै. लाला लजपतरायांच्या बरोबर हद्दपारीची शिक्षा झाली होती व दुसऱ्याला राजद्रोहाबद्दल तुरुंगांत जावें लागलें होतें. वडील सरदार किसनसिंग यांनींही

अनेक सरकारद्रोही चळवळींत भाग घेऊन तुरुंगवास भोगला होता. लाहोरच्या राष्ट्रीय विद्यापीठांत तीन वर्षें घालवल्यावर त्यांच्या वडिलांनीं भगतसिंगांचा विवाह ठरविला; पण ते लग्नाच्या पूर्णपणें विरुद्ध असल्यामुळें त्यांनीं पळ काढला. असहकारितेपासून भगतसिंग गांधीजींचे अनुयायी झाले होते; परंतु सायमन कमिशनपायीं लाला लजपतरायांचा मृत्यु ओढवलेला पाहून ते क्रांतीच्या मार्गाकडे वळले. सप्टेंबर १९२८ मध्यें दिल्ली येथें क्रांतिकारकांचा एक पक्ष स्थापन करण्यांत आला. सरदार भगतसिंग त्या पक्षाचे पुढारी होते. ता. ८-४-१९२९ रोजीं पब्लिक सेफ्टी बिलाच्या वेळीं बटुकेश्वर दत्त यांच्यासह त्यांनीं असेंब्लींत बॉंब टाकला तेव्हांपासून त्यांचें नांव सर्वत्र गाजूं लागलें. या प्रकरणीं त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली; पण त्यांचें तेवढें एकच कार्य नव्हतें. लाहोर कटाच्या खटल्यांत त्यांचें नांव पुढें आलें. या खटल्यांत राजगुरु, जतींद्रदास, सुखदेव, चंद्रशेखर प्रभृति ३३ आरोपी होते. लाहोरचे असिस्टंट पोलिस कमिशनर मि. सॉंडर्स यांचा खून करण्यांत राजगुरूंच्याबरोबर भगतसिंगांचा भाग होता. अधिकाऱ्यांचे खून करणें, पोस्ट व बँक यांवर दरोडे घालणें, बॉंब तयार करणें, असेंब्लींत बॉंब फेकणें इत्यादि अनेक आरोपांवरून राजगुरु व सुखदेव यांच्याबरोबर त्यांना फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली व २३ मार्च १९३१ रोजीं संध्याकाळीं ७॥ वाजतां लाहोर येथें त्यांना फांशीं देण्यांत आलें. "आझादी और जिंदगी एक बात है। गुलामी और मौत एक बात है।" हा त्यांचा अखेरचा संदेश आहे.

★

## ६ ● ● ● खुदीराम बोस

बंगालमधील अत्याचारी क्रांतिकांडाला ज्यानें सुरवात करून दिली, तो खुदीराम बोस म्हणजे १७ वर्षांचा युवक होता. मिदनापूर जिल्ह्यांत त्याचा जन्म झाला. आईबाप लहानपणींच मरून गेल्यामुळें त्याचा सांभाळ त्याच्या बहिणीच्या नवऱ्यानें केला. खुदीरामाचें शिक्षण मिदनापूर हायस्कूलमध्यें थोडें फार झाल्यावर तो क्रांतिकारकांच्या गटांत सामील झाला व थोड्याच दिवसांत मुझफरपूरचे मॅजिस्ट्रेट किंग्जफोर्ड यांना मारण्याची कामगिरी बारींद्रकुमार व उपेंद्रनाथ

यांनीं खुदीरामावर सोंपविली. प्रफुल्लचंद्र चक्रवर्ती याला जोडीदार म्हणून देण्यांत आलें. ३० एप्रिल १९०८ रोजीं दोघांनीं किंग्जफोर्डची गाडी समजून दुसऱ्याच एका चौचाकीवर बॉंब फेकले व पळ काढला. खुदीराम रातोरात २५ मैल पळाला व वेनी स्टेशनवर आला. भूक लागल्यामुळें तेथें तो एका दुकानांत चणेफुटाणे घेत असतां स्टेशनमास्तर पोर्टरला म्हणत होता, 'अरे, ही बातमी ऐकलीस का? काल मुझफरपूरला दोन मडमांचा खून करून दोघेजण फरारी झाले आहेत. त्यांना पकडण्याचें वॉरंट सुटलें आहे. तेव्हां आतां ही गाडी येईल, त्यांत कोणी सांपडतें का पहा.' खुदीरामानें हें भाषण ऐकतांच भान न राहून तो एकदम म्हणाला, 'काय, किंग्जफोर्ड मेला नाहीं?' जवळच्या लोकांना या उद्गाराचें आश्चर्य वाटलें व हा खुनी तर नसेल अशी त्यांना शंका आली. त्याबरोबर खुदीरामानें जोरानें पळ काढला. पोलिस मागें लागले. तीन मैल अंतरावर अखेर तो पोलिसांच्या हातीं लागला. त्या वेळीं त्याच्याजवळ दोन पिस्तुलें व ३० काडतुसें होतीं. ३०२ कलमान्वयें खुदीरामावर खटला होऊन त्याला देहदंडाची शिक्षा झाली. ता. ११-८-१९०८ रोजीं हा तरुण वीर हातांत गीता घेऊन हंसत हंसत फांशीच्या तख्तावर चढला व आनंदानें फाशीं गेला.

★

## ७ ● ● अनंत लक्ष्मण कान्हेरे

अनंत कन्हेरे हा मूळचा औरंगाबादचा. शाळेंतील बरेंचसें शिक्षण त्याचें औरंगाबादलाच झालें. पुढें शिक्षणासाठींच तो नाशकास आला. तो शरीरानें मोठा धिप्पाड नव्हता. परंतु मोठा धाडसी व सोशिक होता. नाशकास त्यानें पिस्तुल चालविण्याचें आणि नेमबाजीचें शिक्षण घेतलें. २१ डिसेंबर १९०९ रोजीं नाशिक येथील एका नाटकगृहांत कान्हेरे यानें जिल्ह्याचे कलेक्टर मि. जॅक्सन यांचा खून केला. त्या दिवशीं किर्लोस्कर मंडळीच्या 'शारदा' नाटकाचा प्रयोग होता आणि जॅक्सनला मुद्दाम आमंत्रण करण्यांत आलें होतें. जॅक्सन आपल्या खुर्चीवर येऊन बसतो न बसतो तोंच कान्हेरेनें आपलें पिस्तुल उपसलें आणि त्याच्यावर सातआठ गोळ्यांचा वर्षाव केला. पहिल्या गोळीलाच जॅक्सनचा बळी पडला. खून करण्याच्या अगोदर दोन दिवस कान्हेरेनें आपला फोटो काढून घेतला होता. थिएटरमध्येंच स्वतःला मारून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला; पण तो

साध्य झाला नाहीं. पोलिसांच्या स्वाधीन होतांना " माझं कर्तव्य होतं तें मी पार पाडलं आहे. मी निसटून जाऊं इच्छित नाहीं," असे उद्गार त्यानें काढले. त्याला ता. १९-४-१० रोजीं ठाण्याच्या तुरुंगांत फांशीं देण्यांत आलें.

★

## ८ ● ● दामोदर हरि चापेकर

यांनीं आपले दोघे बंधु बाळकृष्ण व वासुदेव, महादेव विनायक रानडे व द्रवीड बंधु यांच्या सहकार्यानें २२ जून १८९७ रोजीं पुणें येथें गणेशखिंडींत प्लेग कमिशनर मि. रँड यांचा खून केला. चाफेकरांचें मूळ घराणें कीर्तनकाराचें. दामोदरपंत आपल्या वडिलांप्रमाणेंच कीर्तन करीत. ते सनातनी वृत्तीचे होते व सुधारकांवर त्यांचा कटाक्ष होता. त्यांनीं शरीर कमावण्यासाठीं व्यायामशाळा काढली होती व हिंदु धर्माचें रक्षण करण्याच्या हेतूनें एक मंडळ स्थापन केलें होतें. शिवाजी आणि गणपति या उत्सवांत ते स्वतःचीं पदें करून गात असत. प्लेगच्या दिवसांत रँडशाहीचा जुलूम असह्य झाल्यामुळें त्याचा खून करण्याचा या त्रिवर्ग बंधूंनीं तिघां मित्रांच्या सहाय्यानें बेत केला. रँड व आयर्स्ट यांचे खून केल्याबद्दल दामोदर व बाळकृष्ण फांशी गेले. त्यांचे साथीदार द्रवीड बंधु यांनीं वीस हजार रुपयांच्या आमिषानें सरकारकडे चुगली केली त्यामुळें हा कट उघडकीस आला. वासुदेवराव व रानडे यांनीं द्रवीड बंधूंचे खून करून त्यांच्या विश्वासघातांचें योग्य प्रायश्चित दिलें. त्यामुळें हे दोघेही फांसावर लटकले. मृत्युपूर्वी दामोदरपंतांनीं त्याचवेळीं येरवडा तुरुंगांत असलेले लो. टिळक यांच्याजवळची गीता मागून घेतली व ती हातांत ठेवून दामोदरपंत ता. १८-४-१८९८ रोजीं फांशीं गेले. १८९९ सालच्या मे महिन्यांत ता. ८, १० व १२ रोजीं वासुदेव, रानडे व बाळकृष्ण यांना अनुक्रमानें फांशीं देण्यांत आलें.

" शिवाजीला अवतार समजून व त्याचे पोवाडे म्हणून स्वातंत्र्य मिळत नसतें शिवाजी आणि बाजी यांच्याप्रमाणें जिवावर उदार होऊन निधडेपणाचीं साहसी कृत्यें करीं पाहिजेत. तुम्ही सज्जन लोकांनीं हें लक्षांत घेऊन यापुढें सदैव ढालतलवार बाळगली पाहिजे. आम्ही शत्रूचीं हजारों डोकीं उडवूं. ऐका,

राष्ट्रीय युद्धांत आम्ही धारातीर्थी प्राण देऊं. आमच्या धर्मावर अत्याचार करणाऱ्या शत्रूच्या रक्तानें आम्हीं ही भूमि भिजवून टाकूं. आम्हीं ठार मारल्यावरच मरूं; तुम्ही मात्र बायकांप्रमाणें आमच्या पराक्रमाच्या गोष्टी मागाहून ऐकाल."

"गुलामगिरींत रहावयाला तुम्हाला शरम वाटत नाहीं काय? तसें असेल तर निदान आत्महत्या करण्याचा प्रयत्न करा. हे दुष्ट लोक कसाबाप्रमाणें गाई व वासरें यांची हत्या करीत आहेत. तरी गोमातेला या जाचांतून सोडवा. मरा पण इंग्लिशांना ठार करा. कांहीं न करतां भूमीला भार होऊं नका. आपल्या देशाचें नांव हिंदुस्थान असतांना इंग्रज लोक या देशावर कसें राज्य करूं शकतात?"

"मुंबइतील राणीच्या पुतळ्यावर मीच डांबर ओतलें व पुतळ्याच्या गळ्यांत जोड्यांची माळ घातली. पुण्यांत प्लेगच्या अमदानींत सोजीर लोकांनीं केलेला अत्याचार पाहून मला त्वेष आला व त्यांचा मुख्य अधिकारी रँडसाहेब याला मारून सूड उगविण्याचा मीच निश्चय केला; त्यासाठीं बंदुकी चोरल्या, दारू-गोळा मिळविला, पिस्तुलें व तरवारी घेतल्या; रँडसाहेबाला मारण्याचे माझे पूर्वीचे प्रयत्न फसल्यामुळें ज्युबिलीच्या दिवशीं दिवसभर ईश्वरप्रार्थना करून व हत्यारें बरोबर घेऊन मी व माझा भाऊ बाळकृष्ण असे गणेशखिंड रस्त्यावर गेलों. मी रँडसाहेबाला गोळी घातली व बाळकृष्णानें ले. आयर्स्ट याला मारलें; हत्यारें नाल्यावरील पुलाखालीं छपवून ठेवून आम्हीं कालव्याच्या रस्त्यानें परत आलों; दुसरे दिवशीं लोंढे यांच्या विहिरींत हत्यारें टाकून देऊन ता. २४ जून रोजीं मुंबईस निघून आलों व कीर्तनें करूं लागलों."

—चाफेकर

★

## ९ ● ● बारींद्रकुमार घोष

योगी अरविंद घोष यांचे हे धाकटे बंधु. बंगालमधील १९०८ च्या क्रांति-कारक चळवळीचे सूत्रधार. यांचा जन्म १८८० सालीं इंग्लंडमध्यें झाला. त्यांचें सर्व शिक्षण इंग्रजी पद्धतीप्रमाणें झालें. बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या नेतृत्वाखालीं

बंगालमध्यें स्वदेशी बहिष्काराची चळवळ चालू होती. ती बारींद्रकुमारासारख्या परदेशांतल्या चळवळींचा अभ्यास करणारांनां नापसंत वाटली; म्हणून त्यांनीं रशियन निहिलिस्टांच्या धर्तीवर अत्याचार–प्रवर्तक गुप्त मंडळें सुरू केलीं. बारींद्रकुमारांनीं डाका येथें " अनुशीलन समिति " स्थापन करून सर्व प्रकारचें लष्करी व शारीरिक शिक्षण दिलें व माणिकतोळा बाग हें आपल्या कार्याचें केंद्र ठरविलें. बारींद्रांनीं काढलेल्या ' युगांतर ' पत्रानें इतका जोरदार व जळजळीत प्रचार केला कीं, या राजद्रोही वर्तमानपत्राच्या पांच संपादकांना लागोपाठ शिक्षा झाल्या व अखेर तें पत्र जप्त करण्यांत आलें. ' युगांतर ' हें बंगाली क्रांतिकारकांचें मुख्य पत्र होतें.

मुझफरपूर बॉंब प्रकरणानंतर लवकरच बारींद्रकुमारांना त्यांच्या सहकाऱ्यांसह तावडतोब अटक करण्यांत आली. या खटल्यांत अनेकांना शिक्षा झाल्या. बारींद्रकुमार यांना झालेली फांशीची शिक्षा रद्द होऊन जन्मठेप काळ्या पाण्याची झाली . ता. ११-१२-१९०९ सालीं त्यांची अंदमानला रवानगी झाली.

★

## १० ● ● राशबिहारी बोस

हे १९०८ च्या बंगाली क्रांतिकारकांपैकीं म्हणजे बारींद्रकुमार घोष यांचे अनुयायी. दिल्ली आणि लाहोर कटांत ते होते. १९१२ सालीं लॉर्ड हार्डिंजवर बॉंब टाकण्यांत आला त्यांत त्यांचा हात होता; परंतु ते त्यांतून निसटून दोन वर्षेंपर्यंत गुप्तपणें प्रचार करीत राहिले. पंजाबांत बंडाची उठावणी करण्यासाठीं ते बॉंब व शस्त्रसामुग्री जमवीत आहेत असें कळतांच सरकारनें १९ फेब्रुवारी १९१५ रोजीं त्यांच्या घरावर छापा घातला; परंतु ते त्यावेळीं सरकारच्या हातीं लागले नाहींत. गुप्तपणें हिंदुस्थानला रामराम ठोकून ते जपानांत गेले. ब्रिटिश सरकारचा ससेमिरा त्यांच्या मागें होताच. त्यानें जपानकडे त्यांची मागणी केली; पण 'ब्लॅक ड्रॅगन' संघटनेचे प्रमुख तोयामा यांच्यामुळें ते सुटले. शांघाय येथें त्यांनीं चळवळ सुरू केली. महायुद्धानंतर टोकियो येथें त्यांनीं 'स्वतंत्र हिंदुस्थान संघ' काढला. नेताजी सुभाष यांच्या तात्पुरत्या हिंद सरकारचे ते प्रमुख सल्ला-

गार होते. सिंगापूर व बँकॉक येथें भरलेल्या सुभाषबाबूंच्या परिषदांना ते हजर होते. १९४२ मध्यें दुसऱ्या महायुद्धांत जपाननें हिंदुस्थानवर आक्रमण केल्यावर त्यांनीं 'आझाद हिंद संघ' स्थापन केला व त्यांना बहुमतानें अध्यक्षाचा मान मिळाला. थायलंड, मलाया, ब्रह्मदेश, जावा इत्यादि देशांत प्रवास करून त्यांनीं बरीच जागृति केली. नेताजी सुभाष यांची 'आझाद हिंद सेना' स्थापन होण्या-पूर्वींची भूमिका त्यांनीं तयार केली होती. तीस वर्षें निर्वासित राहून हा जहाल क्रांतिकारक १९४४ मध्यें टोकियो येथें मरण पावला.

★

## ११ ● ● गोपीमोहन साहा

१९२२ सालीं महात्मा गांधींची असहकारितेची चळवळ थंडावली असें समजून बंगालमध्यें नवयुवकांनीं कांहींतरी क्रांतिकारक चळवळ करण्याचें ठरविलें. साऱ्या बंगालमधले थोर पुढारी बेंगॉल ऑर्डिनन्स कायद्यान्वयें सरकारनें विनाचौकशी डांबून ठेविले होते. या दडपशाहीला बंगालचे पोलीस कमिशनर मि. टेगार्ट हे जबाबदार असल्यामुळें तरुण क्रांतिकारकांचा त्यांच्यावर डोळा होता. गोपीमोहन साहानें या दडपशाहीचा सूड घेण्याचें ठरविलें नि टेगार्टला मारण्याचा निश्चय केला. एक दिवस रात्रीं कलकत्त्याच्या चौरंगी रस्त्यावर टेगार्टच्या बंगल्याभोंवतीं तो टपून बसला. एक इंग्रज गृहस्थ त्याच्या बंगल्यांतून बाहेर पडला. त्यालाच टेगार्ट समजून गोपीमोहननें गोळ्या झाडल्या. साहेब जमिनीवर पडतांच जवळ जाऊन साहानें निरखून पाहिलें, तों टेगार्ट नाहीं असें दिसतांच त्यानें पिस्तुल झाडणें बंद केलें. पोलिसांनीं त्याला पकडलें. त्याच्यावर खटला सुरू झाला. जबानींत तो एवढेंच म्हणाला कीं, 'मी ज्याला मारणार होतों तो मेला नाहीं, परंतु एक निरपराधी निष्कारण बळी पडला, याबद्दल मला फार दुःख होतें.' त्याला नंतर फांशी दिलें. गोपीमोहन साहाचें साहस व देशभक्ति यांची प्रशंसा करणारे ठराव कॉंग्रेसच्या अधिवेशनांत मोठ्या बहुमतानें मंजूर झाले आहेत.

★

## १२ ● ● पं. रामप्रसाद बिस्मिल

काकोरी कटाच्या खटल्यांत फांशीची शिक्षा झालेल्या या तरुणाचा जन्म १९०१ सालीं ग्वाल्हेर येथें झाला. अगदीं लहानपणापासून याचे विचार क्रांतिवादी होते. एकोणिसाव्या वर्षापासून त्यानें आगगाडीवर डाके घालण्याच्या कामांत भाग घेण्यास सुरवात केली. नंतर मैनपुरी कटाच्या खटल्यांत याचें अंग आहे असें वाटल्यावरून त्याच्यावर पकडवॉरंट सुटलें. तो बरेच दिवस फरारी होता. या काळांत त्याला वाटेल तीं हलकीं सलकीं कामें करून गुजराण करावी लागली, एवढेंच काय परंतु कित्येक दिवस झाडाचा पाला खाऊनही दिवस काढावे लागले ! त्याची संघटना-चातुरी विलक्षण होती. त्यानें अनेक क्रांतिकारक कृत्यें केलीं. अखेर काकोरी कटांत सांपडल्यामुळें या शूर वीराला ता. १९ डिसेंबर १९२७ रोजीं फाशीं देण्यांत आलें.

★

## १३ ● ● ● सुखदेव

१९२६ सालापासून सुखदेव क्रांतिकारक पक्षांत महत्वाचा घटक समजला जाऊं लागला. कटासंबधींची प्रत्येक कल्पना त्याच्या डोक्यांतून निघत असल्यामुळें त्याला 'कटवाल्यांचा मेंदू' असें नांव मिळालें होतें. नवीन नवीन सभासद मिळविणें व जोरदार संघटन करणें या कामांत तो मोठा पटाईत होता. प्रत्यक्ष अत्याचाराचीं कृत्यें त्यानें केलीं नसलीं तरी त्याची बुद्धिमत्ता व त्याचें संघटनाचातुर्य यामुळें त्या कृत्यांना तो तितकाच जबाबदार होता. १९२८ सालीं पंजाबच्या क्रांतिकारकांचा नायक म्हणून त्याला नेमण्यांत आलें. भगतसिंग, राजगुरु यांच्याबरोबर त्यानें अनेक कटांत भाग घेतलेला होता. लाहोरच्या काश्मीर बिल्डिंगमध्यें त्यानें बॉंब तयार करण्याचा कारखाना चालविला होता. भगतसिंग व राजगुरु यांच्या बरोबरच ता. २३ मार्च १९३१ रोजीं त्यालाही फांसावर टांगण्यात आलें.

★

१४

# जतींद्रनाथ दास

सुप्रसिद्ध क्रांतिकारक जतींद्रनाथ दास यांचा जन्म १९०४ सालीं कलकत्ता येथें झाला. प्राथमिक शिक्षण संपवून त्यांनीं १९२१ सालीं आशुतोष कॉलेजांत नांव दाखल केलें; परंतु देशांतील राजकीय आंदोलनामुळें या तरुणाला स्वस्थ बसवेना. असहकारितेच्या चळवळींत उडी घेऊन त्यांनीं कॉलेजला रामराम ठोकला. कांहीं दिवस ते काँग्रेस कमिटीचें काम पहात होते. या काळांत त्यांना कायदेभंगाबद्दल तीन वेळां कारावासांत जावें लागलें. १९२४ सालीं त्यांनीं 'दक्षिण कलकत्ता तरुण समिति' स्थापन केली. त्या समितीचीं तत्त्वें क्रांतिकारक असल्यामुळें साहजिकच कार्याला जहाल स्वरूप प्राप्त झालें. १९२५ सालीं बंगाल ऑर्डिनन्स कायद्यान्वयें त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. तुरुंगांतील तक्रारींना तोंड फुटावें म्हणून त्यांनीं तेवीस दिवसांचा उपवास सुरू केला. उपवासामुळें त्यांच्या तक्रारींना न्याय मिळून ते विजयी झाले. २७ सप्टेंबर १९२५ सालीं त्यांची सुटका करण्यांत आली. पुढें १९२९ सालीं लाहोर कटाचा खटला सुरू झाला. त्या कटांत जतींद्रनाथांचा संबंध आहे या आरोपावरून त्यांना पकडण्यांत आलें. त्या कटांतील त्यांचे सहकारी मित्र सरदार भगतसिंग व दत्त यांनीं तुरुंगांतील गैरवागणुकीबद्दल अन्नत्याग सुरू केला. जतींद्रनाथांनीं त्यांना सहानुभूति दाखविण्यासाठीं ता० १३ जुलै पासून अन्न घ्यायचें वर्ज्य केलें. कृत्रिम उपायानें त्यांना अन्न घालण्याचा प्रयत्न करण्यांत आला. परंतु त्यांनीं त्या गोष्टीला दाद दिली नाहीं. एवढेंच काय पण सरकारनें त्यांना सशर्त सोडण्याची तयारी दाखविली. परंतु बिनशर्त सुटका होत नाहीं म्हणून त्यांनीं आपला अन्नत्याग चालूच ठेवला. दिवसेंदिवस त्यांचा देह झिजत जाऊं लागला नि अखेर ता० १३ सप्टेंबर १९२९ सालीं त्यांचा देह निश्चल झाला !

## क्रां ति म हि ला

[ सात क्रांति-महिलांचीं चरित्रें ]

संपूर्ण हस्ताक्षरांत लिहिलेलें पहिलेंच पुस्तक

तिरंगी खुलावट : मूल्य चार आणे.